खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

(सुवर्णमहोत्सवी वर्ष)

प्रसिद्धी विभाग

शैक्षणिक वर्ष : २०२६ -२०२७

मराठी विभाग : अभिजात मराठी भाषा दिन उपक्रम

सकाळ

राजगुरू महाविद्यालयात मराठी कवितांचे सादरीकरण

राजगुरुनगर, ता. ४ : हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने अभिजात मराठी भाषा दिनानिमित्त 'तिच्या शब्दांतली मराठी' या उपक्रमांतर्गत मराठी कवयित्रींच्या कवितांच्या अभिवाचन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यातून स्त्री-संवेदना आणि मराठी भाषेचे सौंदर्य प्रभावीपणे मांडण्यात आले.

या प्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे मानद सचिव नानासाहेब टाकळकर, कवयित्री मीनाक्षी पाटोळे, संस्थेचे संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, मराठी विभागप्रमुख डॉ. संजय शिंदे उपस्थित होते. या वेळी टाकळकर यांनी विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी भाषिक कौशल्यांचे महत्त्व अधोरेखित केले. कवयित्री मीनाक्षी पाटोळे यांनी कविता निर्मितीची प्रक्रिया आणि अभिवाचन तंत्रावर मार्गदर्शन केले.

राजगुरुनगर : अभिजात मराठी भाषा दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात कवयित्री मीनाक्षी पाटोळे यांचा सन्मान करताना उपस्थित.

कार्यक्रमात प्रा. कविता पाचारणे, डॉ. सोनल धानापुने, डॉ. हेमलता चौधरी, प्रा. जयश्री बडे, प्रा. प्रतीक्षा खराडे, प्रा. वैभवी कोपर्डे, प्रा. उषा जाधव, डॉ. तृप्ती दळवी, प्रा. वर्षा वाळुंज, प्रा. रोहिणी पाटोळे, प्रा. जयश्री गोगावले, प्रा. कविता कडलग, डॉ. श्वेतांबरी मांडे, डॉ. पायल ओसवाल, प्रा. अपर्णा कुलकर्णी आणि प्रा. ज्योती वाळुंज यांनी विविध कवितांचे सादरीकरण केले. प्रास्ताविक डॉ. संजय शिंदे यांनी केले, तर आभार डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी मानले.

Pune, District-Today
05/10/2026 Page No. 5

पुण्यनगरी

राजगुरू महाविद्यालयात अभिजात मराठी भाषा दिन उत्साहात

। राजगुरूनगर : प्रतिनिधी

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने अभिजात मराठी भाषा दिनानिमित्त (दि. ३) 'तिच्या शब्दांतली मराठी' या उपक्रमांतर्गत मराठी कवयित्रींच्या कवितांच्या अभिवाचन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. मराठी कवितेतील स्त्री-संवेदना, जीवनदृष्टी आणि भाषेचे सौंदर्य यांचा आविष्कार या कार्यक्रमातून घडला.

या प्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे मानद सचिव नानासाहेब टाकळकर, कवयित्री मीनाक्षी पाटोळे, संस्थेचे संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य तथा मराठी विभागप्रमुख डॉ. संजय शिंदे उपस्थित होते.

मानद सचिव नानासाहेब टाकळकर यांनी आपल्या मनोगतात विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी श्रवण, वाचन, संभाषण आणि लेखन या भाषिक कौशल्यांचे महत्त्व अधोरेखित केले.

कवयित्री मीनाक्षी पाटोळे यांनी कवितानिर्मितीची प्रक्रिया, स्त्री-अनुभव, कवयित्रींची संवेदना, भाषेचे सौंदर्य आणि अभिवाचनाचे तंत्र याविषयी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमात प्रा. कविता पाचारणे, डॉ. सोनल धानापुने, डॉ. हेमलता चौधरी, प्रा. जयश्री बडे, प्रा. प्रतीक्षा खराडे, प्रा. वैभवी कोपर्डे, प्रा. उषा जाधव, डॉ. तृप्ती दळवी, प्रा. वर्षा वाळुंज, प्रा. रोहिणी पाटोळे, प्रा. जयश्री गोगावले, प्रा. कविता कडलग, डॉ. श्वेतांबरी मांडे, डॉ. पायल ओसवाल, प्रा. अपर्णा कुलकर्णी आणि प्रा. ज्योती वाळुंज यांनी विविध मराठी कवयित्रींच्या कविता सादर केल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. संजय शिंदे यांनी केले, तर आभार डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी मानले.

04/10/2026 | Page No: 2 | Sub | Pimpri Chinchwad
epaper.punyanagari.in
Powered by - ePaperwale | 9702476117

पुढारी

राजगुरू महाविद्यालयात मराठी भाषेच्या अभिजाततेचा उत्सव

राजगुरुनगर : पुढारी वृत्तसेवा

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने अभिजात मराठी भाषा दिनानिमित्त शनिवारी (दि. ३) 'तिच्या शब्दांतली मराठी' या उपक्रमांतर्गत मराठी कवयित्रींच्या कवितांच्या अभिवाचन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. मराठी कवितेतील स्त्री-संवेदना, जीवनदृष्टी आणि भाषेचे सौंदर्य यांचा आविष्कार या कार्यक्रमातून घडला.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील मराठी कवयित्रींच्या कवितांच्या अभिवाचन कार्यक्रमात बोलताना मान्यवर.

याप्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे मानद सचिव नानासाहेब टाकळकर, कवयित्री मीनाक्षी पाटोळे, संस्थेचे संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य तथा मराठी विभागप्रमुख डॉ. संजय शिंदे उपस्थित होते. मानद सचिव नानासाहेब टाकळकर यांनी आपल्या मनोगतात विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी श्रवण, वाचन, संभाषण आणि लेखन या भाषिक कौशल्यांचे महत्त्व अधोरेखित केले. कवयित्री मीनाक्षी पाटोळे यांनी कवितानिर्मितीची प्रक्रिया, स्त्री-अनुभव, कवयित्रींची संवेदना, भाषेचे सौंदर्य आणि अभिवाचनाचे तंत्र याविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमात प्रा. कविता पाचारणे, डॉ. सोनल धानापुने, डॉ. हेमलता चौधरी, प्रा. जयश्री बडे, प्रा. प्रतीक्षा खराडे, प्रा. वैभवी कोपर्डे, प्रा. उषा जाधव, डॉ. तृप्ती दळवी, प्रा. वर्षा वाळुंज, प्रा. रोहिणी पाटोळे, प्रा. जयश्री गोगावले, प्रा. कविता कडलग, डॉ. श्वेतांबरी मांडे, डॉ. पायल ओसवाल, प्रा. अपर्णा कुलकर्णी आणि प्रा. ज्योती वाळुंज या प्राध्यापिकांनी विविध मराठी कवयित्रींच्या कविता सादर केल्या. त्यांच्या अभिवाचनातून स्त्री-मनातील भावविश्व, जीवनातील विविध अनुभव आणि मराठी भाषेची समृद्ध काव्यपरंपरा प्रभावीपणे व्यक्त झाली. प्रास्ताविक डॉ. संजय शिंदे यांनी केले, तर आभार डॉ. अनुसे यांनी मानले.

My Pune Gramin Edition
Oct 04, 2026 Page No. 5
Powered by: erelego.com

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख